# ऑटिझमग्रस्त मुलांसाठी वरदान स्टेमसेल थेरपी!

विशेष प्रतिनिधी, मुंबई

**स्टेमसेल म्हणजे** मूलपेशींच्या सहाय्याने अनेक असाध्य आजारांवर मात करण्याबाबत जगभरात संशोधन सुरू आहे. काही आजारांवर स्टेमसेल थेरपी परिणामकरक असल्याचे संशोधनात आढळून आले आहे. ऑटिझमच्या (आत्ममग्न)मुलांवरील स्टेमसेल थेरपीचा उपचारामुळे त्यांच्या प्रकृतीत आश्चर्यकारक सुधारणा झाल्याचे संशोधनात दिसून आले आहे.

बरेचवेळा पालकांना आपला मुलगा ऑटिझमग्रस्त असल्याचे कळण्यास उशीर होतो. गेल्या काही वर्षांमध्ये अशा मुलांची संख्या वाढत असून उशीरा बोलण्यास सुरुवात करणे, खूप कमी आवाजात बोलणे, अन्य मुलांमध्ये न मिसळणे, विचित्र खेळ खेळणे, कोणाचा स्पर्श न आवडणे अशी याची लक्षणे आहेत. ही गोष्ट लवकर लक्षात येऊन स्टेमसेल थेरपीद्वारे उपचार केल्यास अशा मुलांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होते, असे मुंबईतील 'ब्रेन ॲण्ड स्पाइन इन्स्टिट्यूट'च्या प्रमुख डॉ. नंदिनी गोकुळचंद यांचे म्हणणे आहे.

पन्नासहून अधिक मुलांवर डॉ. नंदिनी यांनी स्टेमसेल थेरपीद्वारे यशस्वी उपचार केले आहेत. या प्रक्रियेत ऑटिझमग्रस्त मुलाच्या रक्तातून मूलपेशी घेऊन मणक्यातून इंजेक्शनद्वारे मेंदूपर्यंत पोहोचविल्या जातात. यामुळे मेंदूतील पेशींची कार्यक्षमता वाढून अशा मुलांमध्ये खूपच सुधारणा होते. अर्थात स्टेमसेल थेरपीबरोबर स्पीच, बिहेवेरियल, ऑक्युपेशनल आणि सेन्सर इंटिग्रेशनसारख्या उपचार पद्धतींचाही वापर केला जातो. मस्क्युलर डिस्ट्रॉफीवरही (स्नायूदुर्बलता) स्टेमसेल थेरपी उपयोगी असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. ऑटिझम अथवा मस्क्युलर डिस्ट्रॉफी ही मेंदूच्या कार्याशी निगडित समस्या असून जगभरात न्यूरॉलॉजिस्ट तसेच स्टेमसेलवर संशोधन करणारे या आजारावर काम करत आहेत.